महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार









छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २३९ वे | दिनांक : २५/०८/२०२६ | वार : मंगळवार


## मनोज जरांगे आंदोलनावर ठाम; ५८ लाख नोंदींवर प्रमाणपत्रांची मागणी, विखेंचे अधिकाऱ्यांवर कारवाईचे आश्वासन



**जालना :** मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून पुन्हा एकदा राज्यातील वातावरण तापले असताना सरकारचे शिष्टमंडळ मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी अंतरवाली सराटीत दाखल झाले. सरकारतर्फे प्रसाद लाड, राधाकृष्ण विखे-पाटील, उदय सामंत आणि शंभूराज देसाई यांनी जरांगे पाटील यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली. मराठा-कुणबी नोंदी, ५८ लाख नोंदींची आकडेवारी, त्या नोंदींच्या आधारे जात प्रमाणपत्रांचे वाटप, प्रलंबित प्रमाणपत्रे, प्रशासनाकडून होणारी दिरंगाई आणि सातारा गॅझेट या मुद्द्यांवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. चर्चेनंतर राधाकृष्ण विखे-पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारची भूमिका स्पष्ट केली. काही अधिकाऱ्यांकडून निर्णयांची अंमलबजावणी करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ होत असल्याचे निदर्शनास आले असून, अशा अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले. दुसरीकडे, मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला २८ ऑगस्टपर्यंत वेळ दिला असला तरी आंदोलन थांबणार नसल्याचे स्पष्ट केले. चर्चेच्या केंद्रस्थानी ५८ लाख मराठा-कुणबी नोंदींचा मुद्दा होता. सरकारने यापूर्वी विविध टप्प्यांवर ५८ लाखांहून अधिक नोंदी सापडल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे या नोंदींची संख्या आता कमी करण्याचा कोणताही प्रयत्न स्वीकारला जाणार नाही, अशी भूमिका जरांगे पाटील यांनी सरकारसमोर मांडली. शिंदे समितीने गेल्या काही वर्षांत विविध प्रकारच्या अभिलेखांमधून या नोंदी शोधल्या आहेत. त्यामध्ये केवळ पारंपरिक महसूल कागदपत्रांचाच समावेश नसून न्यायालयीन नोंदी, सेवा पुस्तके, सातबारा उतारे, खासरा पत्रे, खरेदीखत, बक्षीसपत्रे आणि अन्य दस्तऐवजांचाही शोध घेण्यात आला असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले. जरांगे यांचा प्रश्न मात्र थेट आहे. ५८ लाख नोंदी सापडल्या असतील तर त्या नोंदींपैकी किती लोकांना जात प्रमाणपत्रे देण्यात आली आणि किती जणांची प्रक्रिया प्रलंबित आहे, याचा स्पष्ट हिशोब सरकारने द्यावा, अशी त्यांची मागणी आहे. त्यांनी सरकारला यापूर्वीच्या घोषणांची आठवण करून देत, आता ५८ लाख नोंदी जुन्या-नव्या अशा वर्गवारीत दाखवून आकडेवारी कमी करण्याचा प्रयत्न करू नये, असा इशारा दिला. मनोज जरांगे पाटील यांनी शिंदे समितीने केलेल्या कामावरूनही सरकारला सवाल केला. गेल्या तीन वर्षांत समितीने विविध विभागांमधील कागदपत्रे तपासून नोंदी शोधल्या. पूर्वी उपलब्ध नसलेल्या किंवा सर्वसामान्यांना सहज सापडत नसलेल्या कागदपत्रांमधील नोंदीही शोधून काढण्यात आल्या. त्यामुळे आता या नोंदी आधीपासूनच अस्तित्वात होत्या, त्या जुन्याच आहेत, असे सांगून त्यांचे महत्त्व कमी करू नये, अशी जरांगे यांची भूमिका आहे. हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीचाही त्यांनी मुद्दा उपस्थित केला. सरकारने विविध प्रकारच्या दस्तऐवजांमधून नोंदी शोधण्याची प्रक्रिया सुरू केली असताना त्याला बगल देणारी कोणतीही भूमिका स्वीकारली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. सरकारच्या म्हणण्यानुसार, पूर्वी मराठा-कुणबी नोंदी शोधण्यासाठी मोजक्याच प्रकारच्या कागदपत्रांचा आधार घेतला जात होता. मात्र शिंदे समितीच्या कामाच्या काळात नियमांमध्ये बदल करून कागदपत्रांची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आली. न्यायालयीन अभिलेख, सेवा पुस्तके, सातबारा उतारे, खासरा पत्रे, खरेदीखत, बक्षीसपत्रे यांसह सुमारे ४० ते ४१ प्रकारच्या कागदपत्रांमधून नोंदी शोधण्यात आल्याचे सरकारच्या बाजूने सांगण्यात आले. या दस्तऐवजांमध्ये मराठा किंवा कुणबी अशी नोंद आढळल्यास ती डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधित व्यक्तीला या नोंदीचा वापर जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी करता येणार आहे. अंतरवाली सराटीत राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांना न्यायमूर्ती शिंदेंशी फोनवरही संवाद साधून दिला. या चर्चेत ५८ लाख नोंदींच्या स्वरूपाबाबत जरांगे यांनी थेट प्रश्न विचारले. विविध प्रकारच्या कागदपत्रांमधून नोंदी शोधण्यात आल्या असून त्या एकत्रित करून संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्याचे सरकारच्या बाजूने स्पष्ट करण्यात आले. एखाद्या व्यक्तीच्या वडिलांच्या खरेदीखतात किंवा अन्य कागदपत्रात मराठा-कुणबी नोंद होती; मात्र ती अनेक वर्षे संबंधित व्यक्तीला सापडली नव्हती, तर अशा नोंदी शोधून उपलब्ध करून देण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले. यावर जरांगे यांनी पुन्हा ५८ लाख नोंदींच्या आकडेवारीचा मुद्दा उपस्थित केला. नोंदी शोधल्या आहेत तर त्या नोंदींच्या आधारे प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करा, अशी त्यांची भूमिका राहिली. सरकारने शोधलेल्या नोंदी सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत नसल्याचा मुद्दाही जरांगे यांनी मांडला. त्यासाठी त्यांनी गावपातळीवर सोपी यंत्रणा उभी करण्याचा प्रस्ताव दिला. एखाद्या गावातील 20, 30 किंवा 50 लोकांच्या मराठा-कुणबी नोंदी सापडल्या असतील तर त्या व्यक्तींची यादी थेट ग्रामपंचायतीवर लावावी. त्यानंतर तलाठी किंवा ग्रामसेवकांनी संबंधित नागरिकांशी संपर्क साधून त्यांची नोंद सापडल्याची माहिती द्यावी. प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे आणि पुढील प्रक्रिया त्यांना समजावून सांगावी, अशी मागणी जरांगे यांनी केली. त्यांच्या मते, अशी प्रक्रिया सुरू केल्यास नागरिकांना तहसील कार्यालये किंवा इतर शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज कमी होईल. दरम्यान, सुमारे 2 लाख नोंदी नव्याने शोधण्यात आल्याचा दावाही मनोज जरांगे पाटील यांनी केला.

## बामूला पहिल्यांदाच ‘आविष्कार’चे यजमानपद; १,५०० विद्यार्थी सहभागी




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मुकुटात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. महाराष्ट्र राजभवनाच्या (लोकभवन) वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित 'राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवा'चे यजमानपद पहिल्यांदाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला मिळाले आहे. गेल्या २० वर्षांच्या इतिहासात या स्पर्धेचे आयोजन करण्याची संधी या विद्यापीठाला प्रथमच मिळाली आहे. येत्या १६ ते १९ जानेवारी २०२७ दरम्यान हा भव्य महोत्सव रंगणार असून, यामध्ये महाराष्ट्रातील २६ विद्यापीठांमधील सुमारे १,५०० नवसंशोधक व विद्यार्थी सहभागी होणार आहेत, अशी अधिकृत माहिती विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे यांनी दिली. विद्यार्थ्यांमधील नावीन्यपूर्ण संशोधन, कल्पकता आणि नवोन्मेष वृत्तीला चालना देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल एस. एम. कृष्णा यांनी २००६ मध्ये 'आविष्कार' स्पर्धेची सुरुवात केली होती. या संदर्भात २ जुलै २०२६ रोजी राजभवनात राज्यातील सर्व विद्यापीठांची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने यजमानपदाचा प्रस्ताव सादर केला होता. महाराष्ट्राचे राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली असून, यजमान विद्यापीठ म्हणून मराठवाडा विद्यापीठाच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. २६ विद्यापीठे, ३ स्तर आणि ६ मुख्य गट या राज्यस्तरीय स्पर्धेचे स्वरूप अत्यंत व्यापक असणार आहे: तीन स्तर: पदवीपूर्व (Undergraduate) पदव्युत्तर (Postgraduate) पदव्युत्तर पदवीनंतरचे विद्यार्थी व संशोधक (Post-PG / Ph.D.) सहा ज्ञानशाखा (गट): मानव्यविद्या, भाषा आणि ललित कला वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा शुद्ध विज्ञान (Pure Sciences) कृषी आणि पशुसंवर्धन अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान वैद्यकशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्र (Medicine & Pharmacy) जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेचे वेध:राज्यस्तरीय स्पर्धेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे २९ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हास्तरीय 'आविष्कार' स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ ऑगस्ट २०२६


## मराठवाड्याच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात विद्यापीठाचे महत्वपूर्ण योगदान - प्राचार्य डॉ.विश्वास कदम



**पाटोदा (प्रतिनिधी) :** मराठवाड्याच्या शैक्षणिक व सामाजिक विकासात विद्यापीठाचे महत्वपूर्ण योगदान आहे!असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी केले ते पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६८ व्या वर्धापन दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की आजच्या काळात विद्यापीठासमोर केवळ ज्ञाननिर्मितीचे नव्हे, तर नवीन तंत्रज्ञान, संशोधन, कौशल्यविकास, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक बांधिलकी यांचेही आव्हान आहे.त्यासाठी आपण सर्वांनी सामुहिक प्रयत्न करावेत असे अवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या शुभहस्ते सकाळी ठिक ७:४५ वाजता विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाच्या स्थापनेमागील उद्दिष्टे, शैक्षणिक व सामाजिक योगदान तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील विद्यापीठाची भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी विद्यापीठाच्या ज्ञान, समता आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे आवाहन केले. भाषणात प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीला शुभेच्छा देत विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणातून समाजाच्या विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन केले. याप्रसंगी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट सदस्या श्रीमती प्रा.डॉ कल्पना घारगे मॅडम,प्रा.डॉ. सुनिल जाधव,प्रा. सोमनाथ घाडगे यांनी ही मौलिक मार्गदर्शन केले. तर शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ चे उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून डॉ प्रवीण शिलेदार यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी त्यांचा सन्मान करण्यात आला.कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साहपूर्ण वातावरणात विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्वांनी सहकार्य केले.ध्वजारोहण कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ. प्रविण शिलेदार यांनी केले तर नंतरच्या कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. बडू लोखंडे यांनी केले व आभार ग्रंथपाल श्रीमती प्रा.ज्योती रकटे यांनी मानले.

## जे.ई.एस. महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी 'दीक्षारंभ' उत्साहात संपन्न

**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** जे.ई.एस. महाविद्यालय जालना येथे ,शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी Student Induction Programme, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयाच्या मध्यवर्ती सभागृहातउत्साहात संपन्न झाला. महाविद्यालयाचे वातावरण, उपलब्ध शैक्षणिक सुविधा तसेच व्यक्तिमत्त्व आणि करिअर विकासाच्या विविध संधींची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते, कार्यक्रमा चे प्रास्ताविक डॉ. करण सातुरे यांनी केले, त्यांनी दीक्षारंभ उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट करत विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाचा पुरेपूर व सकारात्मक उपयोग करून घेण्याचे आवाहन प्रा सातुरे यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. डॉ. उमेश मोगले यांनी पीपीटी (PPT) सादरीकरणाद्वारे महाविद्यालयाची रचना, शैक्षणिक उपक्रम आणि कार्यपद्धतीची सविस्तर माहिती दिली. आयक्यूएसी (IQAC) समन्वयक डॉ. गणेश रोकडे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध सुविधा, संसाधने आणि विद्यार्थी साहाय्य कक्षांची ओळख करून दिली.प्रा शिल्पा कवना यांनी विद्यार्थ्यांना करिअरच्या विविध संधी, भविष्यातील नियोजन आणि शैक्षणिक अभ्याससोबत कौशल्य विकासाचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य डॉ.गणेश अभिनेत्री म्हणाले की, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन अभ्यासा सोबत, जीवनाचा आनंद घ्यावा,त्याचबरोबर ज्ञान संपादन करून जीवनातील ध्येय गाठावे. आपले स्वप्न पूर्ण करावेत असे hi प्राचार्य डॉ. अग्निहोत्री म्हणाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. वर्मा यांनी केले. शेवटी उपस्थिताचे आभार प्रा .भाग्यश्री बियाणी यांनी व्यक्त केले. नाही यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या दीक्षारंभ कार्यक्रमास प्रथम वर्षातील ३९ विद्यार्थिनी आणि ४१ विद्यार्थी अशा एकूण ८० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती होती.

## कार दुचाकी अपघातात एक जण ठार







**दौलताबाद (जावेद अहमद) :** पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि २४ सोमवार रोजी दुपारी एक वाजता धुळे सोलापूर महामार्गावर आसेगाव पुलाजवळ भरधाव कार क्र टाटा पंच GJ 10 DJ 1365 याने दुचाकी क्र MH20 HA 8647 याला समोरून जोरदार धडक दिली असता दुचाकी स्वार राजेश दत्तात्रय चौधरी वय 34 वर्ष राहणार प्रकाश नगर मुकुंद वाडी जिल्हा छत्रपती संभाजीनगर हा गंभीर जखमी झाला होता त्याला जखमी अवस्थेत उपचारासाठी रुग्णवाहिकेत घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आलेवैद्यकीय अधिकारी यांनी राजेश ला तपासून मयत घोषित केलेराजेश याच्या पश्चात आई,वडील,पत्नी,दोन मुले असून तो एका खाजगी कंपनी मध्ये काम करत होताया घटनेची नोंद दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली असून पुढील सहायक पोलीस उपनिरीक्षक रफीक पठाण हे करत आहे




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ ऑगस्ट २०२६


## इकरा पब्लिक ज्युनियर कॉलेजमध्ये इयत्ता ११ वीच्या नवीन विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत






**जळगाव :** इकरा रेसिडेन्शियल पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता ११ वीच्या नवीन तुकडीसाठी भव्य ‘फ्रेशर्स डे’उत्साहात पार पडला.महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.अ.करीम सालार उपस्थित होते.याप्रसंगी इकरा एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी एजाज मलिक, डॉ.शेख हारून बशीर आणि गयासुद्दीन अन्सारी या प्रमुख पाहुण्यांची विशेष उपस्थिती लाभली.यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना एजाज मलिक म्हणाले की, "युवकांमध्ये जग बदलण्याची प्रचंड ताकद आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही व्यसनाधीनतेपासून किंवा वाईट सवयींपासून दूर राहिले पाहिजे." डॉ. हारून शेख यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी आयुष्यात शिस्त, सातत्य आणि नियमांचे पालन करणे किती गरजेचे आहे यावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात डॉ. करीम सालार यांनी विद्यार्थ्यांना वेळेचा सदुपयोग करण्याचा सल्ला देत शिक्षकांच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले, कारण शिक्षकच खऱ्या अर्थाने राष्ट्राची उभारणी करतात.कार्यक्रमा दरम्यान शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकमेकांना परिचय दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्युनिअर कॉलेजचे इनचार्ज मोहसीन खान यांनी केले,तर सूत्रसंचालन प्रा.सुफियान शेख यांनी उत्तमरीत्या सांभाळले. कार्यक्रमाची सांगता सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी आयोजित अल्पोपहाराने झाली.

## तंत्रज्ञान हे साधन आहे साध्य नव्हे, त्याचा वापर विवेकाने करणे ही काळाची गरज - श्री. भैरवनाथ कानडे



**मुरूम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** आजच्या गतिमान युगात बातमी केवळ पोहोचवणे एवढेच माध्यमांचे काम राहिलेले नाही, तर सत्य आणि निष्पक्ष माहिती समाजासमोर आणणे हाच लोकशाहीचा खरा आधार असून ही पत्रकाराची प्राथमिक जबाबदारी आहे. घटनेमागचे सत्य शोधून काढणे हे खऱ्या शोध पत्रकाराचे काम असल्याचे सांगत त्यांनी शोध पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित केले. बातमी तयार करताना तिचा हेतू समाजहित डोळ्यांसमोर ठेवणारा असावा लागतो. सध्याच्या सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) च्या वाढत्या तंत्रज्ञानावर बोलताना त्यांनी पत्रकारांना विशेष खबरदारी घेण्याचा सल्ला दिला. तंत्रज्ञानामुळे माहितीचा ओघ झपाट्याने वाढला असला, तरी यादरम्यान 'फेक न्यूज' पसरण्याचा धोकाही कैक पटींनी वाढला आहे. अशा वेळी पत्रकाराने बातमीची सत्यता पडताळून पाहिल्याशिवाय ती पुढे पाठवू नये, कारण तंत्रज्ञान हे साधन आहे साध्य नव्हे, त्याचा वापर विवेकाने करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन चिकुंद्रा येथील माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक भैरवनाथ कानडे यांनी केले. मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र संशोधन केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विस्तार केंद्राचे उद्घाटन, व्याख्यान व पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रमाणपत्राचे वितरण कार्यक्रम सोमवारी (ता. २४) रोजी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. चौकट : प्रमुख वक्ते म्हणून बोलताना कानडे यांनी प्रसार माध्यमांची बदलती भूमिका, वृत्तसंकलनातील हेतू व दृष्टिकोन, शोध पत्रकारिता, बातम्यांचे विविध प्रकार तसेच आजच्या डिजिटल युगात पत्रकारांसमोर असणारी जबाबदारी आणि तंत्रज्ञानाच्या काळात घ्यावयाची काळजी या विषयांवर उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. यावेळी संस्थेचे संचालक प्रा. डॉ. सतीश शेळके, नॅक समन्वयक डॉ. मुकुंद धुळेकर, डॉ. शिवपुत्र कनाडे, डॉ. सुशील मठपती, डॉ. विनायक रासुरे, सेवानिवृत्त प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले आदींची प्रमुख उपस्थिती होती. या अभ्यासक्रमासाठी ३२ विद्यार्थी परीक्षेस बसले त्यांचा एकूण निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये रवींद्र सोनवणे (प्रथम), आदिराज गायकवाड (द्वितीय), हिराबाई सोलापुरे (तृतीय), प्रा. अक्षय हलसे (चतुर्थ) क्रमांक पटकाविला तर सुयश हुलपल्ले, सचिन गजधाने, नितीन सूर्यवंशी, भैरवनाथ कानडे, अरबाज शेख, उमरफारूक नुरसे, ऋषिकेश तारे, सुनील कांबळे, लालअहमद जेवळे, प्रभाकर महिंद्रकर, नितीन गजधाने, तेजसिंह कोळगे, वीरभद्र चनपटणे आदींनी विशेष श्रेणी मिळविल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते वैचारिक ग्रंथ, भेटवस्तू, प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. नव्याने पत्रकारिता अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या प्रशांत माने, वैभव कटके, रोहन शिंदे यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. चौकट : यावेळी डॉ. सुशील मठपती म्हणाले की, पत्रकार हा निर्भीड व रोखठोक असला पाहिजे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारितेकडे पाहिले जाते. त्यामुळे त्यांनी आपल्या लेखणीतून अन्यायाला वाचा फोडली पाहिजे. या उपक्रमामुळे मुरूम परिसरात पत्रकारितेचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक नवे आणि हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला. अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार म्हणाले की, पत्रकारांनी वास्तविकतेचे भान ठेवून लेखनातून समाज प्रबोधन केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी व्यवसाय व नोकरी करत-करत निरंतर शिक्षण घेऊन स्वतःचे व महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे. यावेळी हिराबाई सोलापुरे, नितीन सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक अभ्यासक्रमाचे समन्वय प्रा. डॉ. महेश मोटे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्राचे संयोजक डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार डॉ. सुजित मटकरी यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारीवृंद व विविध शाखेचे बहुसंख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होत्या.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ ऑगस्ट २०२६


## आयफोनची इच्छा, तीन जीवांचा दु:खद अंत

**छत्रपती संभाजीनगर** : २१ ऑगस्ट २०२६ रोजी छ.संभाजीनगर मध्ये घडलेली दु:खद घटना आपल्याला अनेक गोष्टींवर विचार करण्यास भाग पाडते. मिळालेल्या माहितीनुसार, या दु:खद घटनेत कुणाल चांदगडे, त्याचे वडील मुरलीधर चांदगडे आणि त्याची आई संगीता चांदगडे यांचा मृत्यू झाला.मिळालेल्या माहितीनुसार, एका महागड्या मोबाईल फोनच्या, विशेषत: आयफोनच्या खरेदी आणि हप्त्यांवरून कुटुंबात वाद झाला होता. मोबाईल फोनच्या लालसेमुळे घडलेला दु:खद घटनेचा परिणाम हृदयद्रावक आहे.ही घटना केवळ एका कुटुंबासाठी दु:खद घटना नाही, तर आपल्या संपूर्ण समाजासाठी एक महत्त्वाचा धडा आहे. आज आपण आपल्या गरजा आणि इच्छा यांमधील फरक पुसून टाकला आहे. मोबाईल फोन, कपडे, गाड्या आणि इतर वस्तू कधीकधी अतिप्रदर्शन आणि स्पर्धेची प्रतीके बनतात.खरी समस्या आयफोन नाही; खरी समस्या आहे अनियंत्रित इच्छा, हट्टीपणा, प्रदर्शनासाठीची स्पर्धा आणि समाधानाचा अभाव.केवळ वस्तू विकत घेऊनच नव्हे, तर आपल्या मुलांना संयम, कृतज्ञता, समाधान आणि हलाल व हराम यांतील फरक शिकवणे ही पालकांची जबाबदारी आहे. मुलांना हे शिकवणे महत्त्वाचे आहे की प्रत्येक इच्छा पूर्ण करणे आवश्यक नाही आणि आपल्या क्षमतेपलीकडील गोष्टींसाठी संयम बाळगणे हे दुर्बलतेचे नव्हे, तर शहाणपणाचे लक्षण आहे.आपली संस्कृती आपल्याला समाधान आणि साधेपणा शिकवते. एखाद्या व्यक्तीचे खरे मूल्य त्याच्या मोबाईल फोन, कपडे, गाडी किंवा संपत्तीमध्ये नसते, तर त्याच्या चारित्र्य, नैतिकता, ज्ञान आणि चांगुलपणामध्ये असते.आयफोन पुन्हा विकत घेता येतो, पैसा पुन्हा कमावता येतो, पण गेलेले आयुष्य परत आणता येत नाही.म्हणून, आपण आपल्या नवीन पिढीला हे शिकवले पाहिजे की इच्छा बाळगणे चुकीचे नसले तरी, त्यांचे गुलाम बनणे धोकादायक आहे. वरवरचे जीवन तात्पुरते सुख देऊ शकते, परंतु समाधान, प्रेम आणि चांगले नातेसंबंध हेच खऱ्या शांतीचे साधन आहेत.शेवटी, ही घटना आपल्याला एक धक्कादायक संदेश देते: या जगात मानवी जीवन, पालक आणि नातेसंबंधांपेक्षा अधिक मौल्यवान काहीही नाही. तुमच्या मुलांना जीवनाचे मूल्य, नात्यांचे महत्त्व आणि महागड्या वस्तूंआधी समाधान मानायला शिकवा.




**लेखक :- अल्ताफ अस्मतुल्ला खान (शिक्षक)**
**अल्लामा शिबली उर्दू प्राथमिक शाळा, नवाबपुरा छ. संभाजीनगर**


## दाते पाटलांची प्रकृती खालावली : रुग्णालयात दाखल होण्याचा डॉक्टरांचा सल्ला!




**छत्रपती संभाजीनगर** : शाश्वत मराठा आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने आमरण उपोषणाला बसलेले ज्येष्ठ अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते-पाटील रविवारी (दि. २४) सोळाव्या दिवशीही उपोषणावर ठाम राहिले. सलग पंधरा दिवस उपोषण केल्याने त्यांची प्रकृती खालावली असून, रक्तातील साखरेची पातळी ४० पर्यंत घसरली आहे. रक्तदाबातही चढ-उतार होत असल्याची माहिती आंदोलकांनी दिली.प्रकृती चिंताजनक झाल्याने डॉक्टरांनी राजेंद्र दाते पाटील यांना रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला. मात्र, मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याची भूमिका त्यांनी कायम ठेवली. त्यामुळे आंदोलनस्थळी त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.गेल्या पंधरा दिवसांपासून सरकारकडून आंदोलनाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. दाते पाटील यांच्या प्रकृतीला काही धोका निर्माण झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारची असेल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आंदोलनस्थळी न आल्याने आंदोलकांनी संताप व्यक्त केला. राजेंद्र दाते पाटील यांच्या मागण्यांवर सरकारने तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी त्यांनी केली. दिवसभर विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन दाते पाटील यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. डॉ. शिवानंद भानुसे,लक्ष्मणबापू शिरसाठ, योगेश शेळके, सुनील कोटकर, विजय काकडे, निखिल काकडे यांच्यासह कार्यकर्ते आंदोलनस्थळी उपस्थित होते. डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या भूमिकेमुळे आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## काळ्या बाजारात लिलाव 'जिज्ञासेचा' की भविष्याचा? GNM नर्सिंगचा कागदी फुगा फुटला!

**छत्रपती संभाजीनगर** : शैक्षणिक पटलावर पुन्हा एकदा भ्रष्टाचार आणि बेजबाबदारपणाचा काळिमा फासला गेला आहे. रुग्णसेवेचे पवित्र व्रत घेणाऱ्या GNM नर्सिंग परीक्षेचा पेपर थेट बाजारात फुटून उघड्यावर विकला जावा,याहून मोठे दुर्दैव ते कोणते? जे हात उद्या रुग्णांच्या नाडीवर धडधडणारे आयुष्य वाचवणार आहेत,तीच हात आज परीक्षेआधी फुटलेल्या प्रश्नपत्रिकांच्या छायेत पिचली जात असतील,तर हा केवळ एका परीक्षेच्या गळतीचा विषय नाही; तर हा संपूर्ण आरोग्य यंत्रणेच्या विश्वासावर झालेला जीवघेणा हल्ला आहे.अभ्यासाच्या समिधा अर्पण करून अहोरात्र कष्ट उपसणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी आणि 'सर्टिफिकेट' विकत घेणाऱ्या लाचखोरांची चांदी! हा प्रकार म्हणजे शिक्षणाच्या पवित्र मंदिरात मांडलेला उघडउघड लिलाव आहे. पेपरफुटीच्या या मालिकेमुळे परीक्षा मंडळ आणि प्रशासकीय यंत्रणेचा नाकर्तेपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.बंद दाराआड चालणारे हे गैरव्यवहाराचे साखळी नेटवर्क नेमके कोणाच्या आशीर्वादाने फोफावते आहे,असा जळजळीत सवाल आता जनतेच्या मनात निर्माण होत आहे.केवळ चौकशीच्या पोकळ घोषणा आणि तात्पुरत्या निलंबनाचे नाटक करून हे पाप धुऊन निघणार नाही.या रॅकेटच्या मुळाशी असणाऱ्या सूत्रधारांच्या मुसक्या आवळून त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे.रुग्णसेवेची धुरा सांभाळणाऱ्या भावी परिचारिकांच्या भवितव्याशी खेळणारा हा 'काळा बाजार' समूळ नष्ट झाला नाही,तर उद्याच्या आरोग्यव्यवस्थेचे भवितव्य केवळ आणि केवळ व्हेंटिलेटरवरच दिसेल.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ ऑगस्ट २०२६


## नागपूरच्या गोधनी जलशुद्धीकरण केंद्रात क्लोरिन गॅस गळती

**नागपूर :** नागपूरच्या गोधनी ग्रामपंचायत परिसरातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्लांटमध्ये मध्यरात्रीच्या सुमारास क्लोरिन गॅसची गळती झाल्याने खळबळ उडाली आहे. या गॅसच्या संपर्कात आल्याने 40 हून अधिक नागरिकांना मळमळ आणि उलट्यांचा त्रास झाला असून, 15 पेक्षा अधिक जणांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून प्लांटच्या 200 मीटर परिसरातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले असून, एनडीआरएफ आणि अग्निशमन दलाकडून बचावकार्य सुरू आहे.

दरम्यान, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या जलशुद्धीकरण केंद्रात क्लोरिन गॅसची गळती नेमकी कुठून आणि कशामुळे झाली, याचा तपास सध्या आपत्ती व्यवस्थापन पथक आणि तांत्रिक अधिकाऱ्यांकडून सुरू आहे. जलशुद्धीकरणासाठी वापरण्यात येणाऱ्या क्लोरिनच्या साठवणूक व्यवस्थेत काही तांत्रिक बिघाड झाला होता का, तसेच टँकरमधून गॅसची गळती झाली का, या दोन्ही शक्यतांचा तपास केला जात आहे. गॅस गळतीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, तांत्रिक तपास पूर्ण झाल्यानंतरच त्याबाबत अधिकृत माहिती समोर येणार आहे. दरम्यान, पोलिसांकडूनही घटनास्थळाची पाहणी करून संबंधित बाबींची चौकशी केली जात आहे.

40 जण रुग्णालयात दाखल; 12 जणांना उपचारानंतर डिस्चार्ज

मध्यरात्री अंदाजे 12:15 वाजण्याच्या सुमारास जलशुद्धीकरण केंद्रात गॅस गळती सुरू झाली. हवेत गॅस पसरताच परिसरातील नागरिकांना अचानक दम लागणे, डोळ्यांची जळजळ होणे आणि खोकल्याचा त्रास जाणवू लागला. या घटनेत बाधित झालेल्या 40 नागरिकांना तातडीने जवळच्या शासकीय आणि खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

यापैकी 12 जणांची प्रकृती उपचारानंतर सुधारल्याने त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. तर उर्वरित 28 जणांवर उपचार सुरू आहेत. त्यातील 4 ते 5 नागरिकांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात (ICU) हलवण्यात आले आहे. काही बालके आणि ज्येष्ठ नागरिकांचाही बाधितांमध्ये समावेश असल्याची माहिती आहे. दरम्यान, रुग्णालयात दाखल असलेल्या सर्वांची प्रकृती सध्या धोक्याबाहेर असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.घटनेची माहिती मिळताच नागपूर पोलीस, अग्निशमन दल आणि NDRFच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. रात्रीपासूनच परिसरात रेस्क्यू ऑपरेशन राबवून बाधित नागरिकांना सुरक्षितपणे रुग्णालयात हलवण्यात आले, तर खबरदारीचा उपाय म्हणून इतर नागरिकांनाही सुरक्षित स्थळी हलवण्यात आले.

गॅस निष्प्रभ करण्यासाठी NDRFच्या जवानांनी विशेष सुरक्षा पोशाख आणि PPE किट परिधान करून 3 ते 4 वेळा जलशुद्धीकरण केंद्राच्या आत प्रवेश केला. गॅस गळतीचा स्रोत शोधून ती रोखण्यासोबतच परिसरातील गॅसचा प्रभाव कमी करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

पोलिसांचे नागरिकांना आवाहन

नागपूर शहरातील गॅसगळतीच्या घटनेनंतर परिस्थितीवर सध्या नियंत्रण मिळवण्यात आले असले, तरी नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नागपूर शहर पोलिसांनी महत्त्वाचे आवाहन केले आहे. फागो पाटील ले-आऊट आणि नागमंदिर टेकडी परिसरातील 200 मीटरचा भाग प्रतिबंधित करण्यात आला असून, नागरिकांनी या परिसरात प्रवेश करू नये, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

सुरक्षेच्या उपाययोजना म्हणून सकाळी 11 वाजेपर्यंत नागरिकांनी या 200 मीटरच्या परिसरात जाणे पूर्णपणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. परिसरात गॅसचा प्रभाव पूर्णपणे संपेपर्यंत नागरिकांनी अनावश्यकपणे घराबाहेर पडणे टाळावे आणि सुरक्षित अंतर राखावे. दरम्यान, गॅसगळतीनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## लेखन प्रेरणा दिनानिमित्त ‘प्रज्ञावंत साहित्यिक अण्णा भाऊ साठे’ परिसंवाद ज्ञानसत्र संपन्न




**नाशिक (प्रतिनिधी) :** साजऱ्या होत असलेल्या ‘लेखन प्रेरणा’ दिनानिमित्त ‘प्रज्ञावंत साहित्यिक अण्णा भाऊ साठे’ या विषयावर परिसंवाद ज्ञानसत्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडीओवर विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांची संकल्पना व प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शक सूचनेनुसार दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी हे ज्ञानसत्र संपन्न झाले. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी या ज्ञानसत्राचे समन्वयन व सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन केले.समग्र परिवर्तनाची आस, कामगार चळवळ, दलित चळवळ, मार्क्सवादी व आंबडेकरवादी धगधगते भारतीय समाज वास्तव जातीअंत व वर्गअंत यावर आधरित जानिवा पूर्ण करणारे लेखनही प्रज्ञावंत साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांच्या नव्या युगाची हाक होती असे विवेचन डॉ. राजेंद्र बगाटे, डॉ . सचिन पोरे, डॉ. वासुदेव राऊत, प्रा. विजयकुमार पाईकराव या सर्वच परीसंवादकांनी केले. हा कार्यक्रम अध्ययनार्थी व श्रोत्यांसाठी https://avc.ycmou.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर कायमस्वरूपी श्रवणासाठी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जयदीप निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रसहाय्यक श्री. प्रकाश सापनर, श्री. गिरीश गवळी यांनी तांत्रिक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचा अध्ययनार्थी, शिक्षक, संशोधक तसेच सर्व नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनप्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. दिपक राजगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी-टाटा ट्रस्टच्या करारातून ‘रूग्णांना’ दिलासा

**मुंबई :** भगवंत पाळवदे दि. २४: यकृत प्रत्यारोपण, कर्करोग आणि मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या महागड्या उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्ट यांच्यात करण्यात आलेला पहिलाच सामंजस्य करार राज्यातील गरजू रुग्णांसाठी दिलासादायक ठरत आहे. या करारामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळत असून रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या करारानंतर अवघ्या सहा महिन्यांत राज्यातील विविध भागांतील ९ रुग्णांना ८९ लाख ६० हजार ३०१ रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या मदतीतून यकृत प्रत्यारोपण, कर्करोगावरील उपचार, मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या अत्यंत खर्चिक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. पहिल्यांदाच झालेल्या या कराराअंतर्गत राज्यातील १५० गरजू रुग्णांना दुर्धर आणि गंभीर आजारावर उपचारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी वैद्यकीय मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, अशाच प्रकारचे करार इतर अनेक नामांकित संस्थांसोबतही प्रक्रियेत असून ते लवकरच पूर्णत्वास येणार आहेत. त्यामुळे राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून शासन, सामाजिक संस्था आणि आरोग्य क्षेत्र यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या रुग्णांना नवे जीवन मिळण्यास मदत होत आहे.प्रतिक्रिया :मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा सामंजस्य करार करण्यात आला. याच धर्तीवर इतरही अनेक नामांकित संस्थांसोबत सामंजस्य करार करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यातून राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत उपलब्ध होणार आहे. पैशांअभावी कोणत्याही रुग्णाचा उपचार थांबू नये, या उद्देशातून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष सातत्याने कार्यरत आहे. गरजू रुग्णांनी अधिक माहितीसाठी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ ऑगस्ट २०२६

## निरगुडी बु.ठाकरवाडी येथे आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशनच्या तालुका कार्यकारिणी व गाव कमिटी शाखेचे उद्घाटन

**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशनच्या वतीने खुलताबाद तालुका कार्यकारिणी व गाव कमिटी शाखेच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन २७ ऑगस्ट २०२६ रोजी निरगुडी बु. ठाकरवाडी, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा. पांडुरंग पारधी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुका कार्यकारिणी तसेच गाव कमिटी शाखेचे उद्घाटन करण्यात येणार आहे.या प्रसंगी फाउंडेशनच्या वतीने समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. आदिवासी समाजामध्ये सामाजिक एकता, संघटन आणि विकासाची भावना अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमासाठी गाव कमिटी, निरगुडी बु. ठाकरवाडी यांच्याकडून समाजबांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## देवधन श्यामराव धुवे यांना पी. एचडी प्रदान



**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने नुकतेच देवधन श्यामराव धुवे यांना पीएचडी (विद्यावाचस्पती) ही पदवी प्रदान करण्यात आली. देवधन धुळे यांनी " पाली आणि बुद्धिझम" या विभागांतर्गत श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी येथील हिंदी विभागात कार्यरत असलेले विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ.बालाजी कोनाळे यांच्या मार्गदर्शनाखाली " पाली साहित्यात प्रतिबिंबित तथागत बुद्धांची राजकीय आणि प्रशासकीय विचारधारा : एक चिकित्सक अध्ययन " या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता. नुकतीच त्यांची मौखिक परीक्षा होऊन विद्यापीठाने त्यांना "विद्यावाचस्पती" या संशोधन क्षेत्रातील सर्वोच्च पदवीसाठी पात्र ठरविले. त्यामुळे विद्यापीठाच्या विभागांतर्गत त्यांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला .यावेळी विभागातील अनेक मान्यवर उपस्थित होती.यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून या यशाप्रसंगी संशोधन मार्गदर्शक प्रा.डॉ.बालाजी कोनाळे,"पाली आणि बुद्धिजम" विभाग प्रमुख डॉ. अशोक सोनवणे डॉ.पंकज मेश्राम ,डॉ. वैशाली खापर्डे ,डॉ. संजय राठोड, प्रा.डॉ.शंकर अंभोरे ,प्रा. डॉ.रजनी गेडाम ,श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटीचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनी त्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




## उपमुख्यमंत्र्यांनी चाकणला भेट दिली, रस्ते दुरुस्तीची पाहणी केली

**पुणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि उद्योगांचे स्थलांतर रोखण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे म्हटले आहे. पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी तातडीची आणि दीर्घकालीन पावले उचलली जात असल्याची घोषणा त्यांनी केली.

शिंदे यांनी तळेगाव आणि चाकण येथे भेट देऊन रस्त्यांच्या दुरुस्ती कामाची पाहणी केली, तसेच उद्योजकांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, विधान परिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार शरद सोनवणे, आमदार बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलिसआयुक्त विनयकुमार चौबे यांच्यासह अनेक उद्योजक आणि अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्र्यांनी चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडीच्या ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सद्यस्थितीची माहिती घेतली. त्यांनी एम-६० हार्डनर वापरून खड्डे बुजवण्याचे काम आणि पावसाने खराब झालेल्या रस्त्यांवर थेट कास्टिंग केलेले पॅचेस बसवण्याच्या कामाची पाहणी केली. या नवीन तंत्रज्ञानामुळे कमी वेळात रस्ता पूर्ववत होऊन अवजड वाहनांसाठी खुला करणे शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

चाकण-शिक्रापूर मार्गावरील मोठ्या खड्ड्यांमुळे उद्योजकांना वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसत आहे. पावसाळ्यात पारंपरिक डांबरीकरण टिकत नसल्याने, यावर मात करण्यासाठी जिओ पॉलिमर टेक्नो पॅच आणि एम-६ आरएमसी विथ हार्डनरचा वापर केला जात आहे. जिओ पॉलिमर मिश्रण अर्धा ते पाऊण तासात सेट होत असल्याने खड्डे भरल्यानंतर तातडीने वाहतूक सुरू करणे शक्य होते. तसेच, सर्वाधिक खराब झालेल्या ठिकाणी प्री-कास्ट पॅनेल ट्रेलरद्वारे आणून थेट बसवण्यात येत आहेत.

औद्योगिक क्षेत्रातील समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष नोडल समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीची बैठक आता दर शुक्रवारी होणार असून, रस्ते, ड्रेनेज, फुटपाथ आणि स्ट्रीट लाईट्ससह पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला जाईल. चाकणमध्ये येणाऱ्या वाहनांची ये-जा सुलभ व्हावी यासाठी तळेगाव ते शिक्रापूर या 54 किलोमीटर मार्गाची दुरुस्ती, नाशिक फाटा ते राजगुरुनगर रस्ता आणि अंतर्गत रस्ते बांधणीला गती दिली जाणार आहे. रस्ते बांधताना फुटपाथ, युटिलिटी आणि सायकल ट्रॅकचा समावेश करण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.


कामगारांच्या प्रवासाचा वेळ वाचावा यासाठी औद्योगिक क्षेत्रात क्लस्टरच्या माध्यमातून कामगार वसाहती (टाउनशिप) उभारण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. तसेच निगडी ते चाकण, चाकण ते राजगुरुनगर आणि तळेगाव ते शिक्रापूर या मेट्रो मार्गांचा विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश महामेट्रो प्राधिकरणाला देण्यात आले आहेत. उद्योजकांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी एमआयडीसीचे कार्यकारी अभियंते व इतर अधिकारी आठवड्यातून एक दिवस प्रत्यक्ष उपलब्ध राहतील. तसेच उद्योजकांनी आपल्या समस्या मांडण्यासाठी 'मैत्री' ॲपचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन करण्यात आले. वीज ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवून लोडशेडिंगचे नियोजन करणे, स्वतंत्र एजन्सीमार्फत कचऱ्याची विल्हेवाट लावणे तसेच पाणीपुरवठा व पोलिसप्रशासनाशी संबंधित प्रश्न तातडीने सोडवण्याबाबतही बैठकीत निर्णय घेण्यात आले. शासनाच्या या सर्व उपाययोजनांमुळे उद्योजकांच्या समस्यांचे निवारण होऊन त्यांचे समाधान झाले असून, उद्योजकांनी आपले उद्योग बाहेर नेण्याबाबतचे मतपरिवर्तन झाल्याचे यावेळी स्पष्ट केले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ ऑगस्ट २०२६

# पुंजा तात्या : हसतमुख व्यक्तिमत्त्वाचा हळवा निरोप



बाभुळगावच्या गावकरी ग्रुपवर एक दुःखद बातमी वाचल्यानंतर मन अक्षरशः गहिवरून आले. संपूर्ण गावामध्ये पुंजा तात्या, ‘पुंजाबा’ किंवा ‘पुंजा गोपाळा’ या नावाने परिचित असलेले पुंजा तात्या आज आपल्यात नाहीत, ही वस्तुस्थिती मनाला स्वीकारता येत नाही.माझ्या वडिलांचे पुंजा तात्या अतिशय जवळचे मित्र होते. माझ्या वडिलांचा आणि पुंजा तात्यांचा जो ऋणानुबंध होता, तो शब्दांत व्यक्त करणे खरोखरच अशक्य आहे. आज त्या नात्याचा भावनिक पूल तुटल्याची जाणीव मनाला अस्वस्थ करून जाते.पुंजा तात्यांच्या आठवणींना उजाळा देताना जवळपास ३०-३५ वर्षे मागे जावे लागते. त्या काळातील अनेक आठवणी आजही डोळ्यांसमोर तरळताना दिसतात. आमच्या गावामध्ये दगडू तात्या, पुंजा तात्या, कैलासभाऊ, पुंजाबा दिवेकर, विनायक अण्णा, कचरू ड्रायव्हर ,काभूनाना, सांडूनाना, माझे वडील, मगनदादा, सोपान दुकानदार, चौधरी अण्णा ,इकराम भाई,रऊफ मामु, अमीर भाई, मोयोद्दीन भाई , बाबासाहेब भाऊ,देवरावभाऊ, भागिनाथ भाऊ , परभत आबा, सराईपरभत भाऊ अशी अनेक जिव्हाळ्याची मंडळी होती. या सर्वांचे परस्पर संबंध अत्यंत आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे होते.गावातील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये ही मंडळी उत्स्फूर्तपणे सहभागी होत असत. गावाच्या हितासाठी कोणत्या वेळी राजकारणाला खांदा द्यायचा आणि कोणत्या वेळी खांदा काढून घ्यायचा, याचे भान त्यांना चांगलेच होते. त्यांच्या प्रत्येक कृतीमागे गावहिताची भावना असायची. वैयक्तिक स्वार्थ किंवा कोणत्याही प्रकारचा फाजीलपणा त्यांच्या वागण्यात कधीच दिसला नाही.पुंजा तात्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार केला की त्यांच्या मनमोकळ्या स्वभावाबरोबरच माणुसकीला दिलेले महत्त्व विशेषत्वाने जाणवते. ग्रामीण जीवनाची खरी ताकद ही केवळ धर्म, जात किंवा पंथात नसून एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्यात असते. आमच्या गावातील या मंडळींच्या संबंधांतून हीच मानवतावादी संस्कृती प्रकर्षाने जाणवते.गावातील जत्रा, दिवाळी, ईद, आंबेडकर जयंती व शिवजयंती यांसारख्या सण-उत्सवांमध्ये सर्व समाजातील लोक एकत्र सहभागी होत असत. धार्मिक भिन्नता बाजूला ठेवून सामूहिक आनंद साजरा करण्याची ही परंपरा गावाच्या सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडवते. ग्रामीण भागातील पीर-दर्गा संस्कृतीही या सहअस्तित्वाचे महत्त्वाचे उदाहरण आहे. हिंदू धर्मीय लोक मुस्लिम पीर किंवा दर्ग्याला नवस बोलतात आणि उरूसामध्ये श्रद्धेने सहभागी होतात. अशा परंपरांमुळे धर्माच्या पलीकडे जाऊन माणसामाणसांतील विश्वास आणि आपुलकी दृढ होत जाते.सुख-दुःखाच्या प्रसंगीही हीच माणुसकी प्रकर्षाने दिसून येते. शेतीतील संकटे, दुष्काळ, आर्थिक अडचणी किंवा कौटुंबिक दुःख असो, गावातील लोक एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत असत. रक्ताचे नाते नसतानाही दादा ,तात्या, अण्णा ,नाना,‘चाचा’, ‘मामा’, ‘भाऊ’ अशा आपुलकीच्या नात्यांनी माणसे एकमेकांशी जोडली जात. ही नाती केवळ संबोधनापुरती मर्यादित नसून त्यामागे जिव्हाळा, विश्वास आणि परस्पर सहकार्याची भावना असायची.याच अर्थाने पुंजा तात्यांचे व्यक्तिमत्त्व हे धर्मनिरपेक्ष मानवतावादाचे जिवंत उदाहरण होते. माणसाचे चारित्र्य, माणुसकी आणि गावाप्रती असलेली निष्ठा यांना त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यामुळे पुंजा तात्यांसारखी माणसे केवळ एका कुटुंबाची किंवा एका समाजाची नसतात; तो संपूर्ण गावाची असतात.पुंजा तात्यांच्या अनेक आठवणींपैकी दोन-तीन आठवणी विशेषतः मनात घर करून राहिल्या आहेत. त्यामध्ये गमती-जमती आहेतच; पण त्याचबरोबर माझ्या वडिलांशी त्यांचा असलेला ऋणानुबंध किती वेगळा आणि जिव्हाळ्याचा होता, हेही जाणवते.सन २००२ मध्ये आमच्या इमारतीचे काम सुरू होते. माझे वडील तेथे बसलेले असताना पुंजा तात्या आले. त्यांनी वडिलांना सांगितले, “तुमच्या इमारतीच्या संदर्भात गावात एक वेगळीच चर्चा आहे.”वडिलांना तात्यांचा स्वभाव चांगलाच माहीत असल्यामुळे त्यांनी हसत विचारले, “नेमकी काय चर्चा आहे?”तात्या म्हणाले, “तुम्ही जी इमारत बांधत आहात, तिच्याबद्दल काही लोक तुपे साहेबांना म्हणाले आहेत की ताजुभाईंची इमारत केवळ तुमच्या बोररवर बांधली जात आहे.”वडिलांनी विचारले, “ते कसं काय?”तात्या म्हणाले, “तुमच्या बंधाऱ्यावर असलेली बोरं मुलं तोडून बाजारात विकतात आणि त्यातून जो पैसा मिळतो, त्या पैशातून तुमच्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे, अशी गावात चर्चा आहे!”हा प्रसंग आठवला की आजही हसू येते. समोरच्याला विनोद कळू न देता तो अगदी गंभीर विषय असल्यासारखा सांगण्याची पुंजा तात्यांची हातोटी विलक्षण होती. त्यांचा प्रांजळ आणि मनमोकळा स्वभावच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती. प्रत्येकाशी हसतमुखाने बोलणे, मनमुरादपणे जगणे आणि आपल्या विनोदातून वातावरण प्रसन्न ठेवणे, हे त्यांचे वैशिष्ट्य होते.दुसरी एक आठवण पोळ्याच्या सणाची. पोळ्याच्या निमित्ताने तात्यांनी माझ्या वडिलांना जेवणासाठी बोलावले होते. त्याच वेळी मुंदडा सेठ आणि तुपे साहेब भेटले. त्यांनीही वडिलांना आपल्या घरी जेवायला येण्याचा आग्रह केला.वडील म्हणाले, “मी एकच व्यक्ती आहे; तीन ठिकाणी जेवायला कसा येणार?”त्यावर पुंजा तात्या लगेच म्हणाले, “तिघांचे ताट एका ठिकाणी आणू; तुम्ही जेवू शकता!”वडिलांनी होकार दिला. त्यानंतर ते मुंदडा सेठ यांच्या घरी जाऊन बसले. ताट वाढले गेले. त्यानंतर पुंजा तात्याही ताट घेऊन आले आणि तुपे साहेबही ताट घेऊन आले.हे पाहून वडिलांनी मिश्कीलपणे म्हटले, “आता हे काय करायचं?”तात्या म्हणाले, “तुम्ही जेवून घ्या!”वडील म्हणाले, “मी हे सगळं बांधून घेऊन जातो आणि घरी जेवतो.”तात्या हसत म्हणाले, “ठीक आहे!”यानंतर पुंजा तात्यांनी वडिलांना गंमतीने विचारले, “ताजुभाई, आता सांगा, यापैकी तुम्हाला कोणाचं काय आवडलं? पण एकाच व्यक्तीचं नाव घ्यायचं!”वडिलांसमोर मोठाच प्रश्न उभा राहिला. एकाचे नाव घेतले तर दुसरा नाराज होणार आणि दुसऱ्याचे नाव घेतले तर तिसरा रागावणार! त्यात तुपे साहेबांचा स्वभाव थोडा तापट होता; पण मनाने फार निर्मळ.शेवटी वडिलांनी मिश्कील उत्तर दिले, “तुमच्या दोघांचा सारखा ठीक आहे; पण तुपे साहेबांच्या साराला शहाजिऱ्याची फोडणी दिलेली आहे. त्यामुळे तो तुमच्या दोघांपेक्षा उत्तम आहे!”या एका वाक्याची चर्चा दुसऱ्या दिवशी संपूर्ण गावात रंगली होती. अशा छोट्या-छोट्या प्रसंगांतून पुंजा तात्यांची विनोदबुद्धी, मनमोकळेपणा आणि माणसांना जोडून ठेवण्याची कला दिसून येते.आज पुंजा तात्या, दगडू तात्या, तुपे साहेब आणि माझे वडील हे आपल्याला सोडून काळाच्या पडद्याआड जरी गेले असले, तरी त्यांच्या आठवणी, त्यांचे कार्यकर्तृत्व आणि त्यांनी जपलेली माणुसकी गावकऱ्यांच्या मनात सदैव जिवंत राहील.काळ पुढे जाईल, पिढ्या बदलतील; मात्र अशा माणसांनी निर्माण केलेली आपुलकीची नाती, परस्पर सहकार्याची भावना आणि माणुसकीची परंपरा कधीही पुसली जाणार नाही. त्यांच्या आयुष्यातील प्रसंग आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतात—धर्म, जात आणि पंथ यांच्यापेक्षा माणूसपण मोठे असते आणि माणसामाणसांतील प्रेम, विश्वास व सहकार्य हेच गावाच्या सामाजिक जीवनाचे खरे वैभव असते.पुंजा तात्यांच्या निधनाने आमच्या गावातील एक मनमोकळे, प्रेमळ, विनोदाचे बादशहा आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही.पुंजा तात्यांच्या परिवाराला हे दुःख सहन करण्याचे बळ मिळो, हीच मनःपूर्वक इच्छा व्यक्त करतो. भावपूर्ण आदरांजली! पुंजा तात्या, आपल्या आठवणी सदैव मनात जिवंत राहतील.

**प्रा. डॉ.शेख आरिफ ताजुद्दीन**
**बाभुळगावकर**



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार २५ ऑगस्ट २०२६


## विवंचना': अंधश्रद्धा, अन्याय आणि विवेकाचा संघर्ष

डॉ. कोंडबा भगवान हाटकर यांची 'विवंचना' ही कादंबरी केवळ एका प्रेमकथेची किंवा वैयक्तिक जीवनसंघर्षाची कहाणी म्हणून वाचता येत नाही. ती भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय विषमता, विवाहसंस्थेतील अंतर्विरोध, स्त्रीच्या अस्तित्वावरील बंधने, धार्मिक दांभिकता, अंधश्रद्धा, पुरुषसत्ताक मानसिकता आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या नावाखाली होणाऱ्या मानवी भावनांच्या गळचेपीचा अत्यंत संवेदनशील आणि भेदक वेध घेणारी साहित्यकृती आहे. महात्मा जोतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी, विवेकवादी आणि समतावादी विचारपरंपरेचा संस्कार या कादंबरीच्या आशयविश्वावर जाणवतो. त्यामुळे 'विवंचना' ही केवळ मनोरंजनप्रधान कथा न राहता मानवी स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि सामाजिक परिवर्तन यांच्या प्रश्नांशी संवाद साधणारी विचारप्रवर्तक कादंबरी ठरते.कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे रेशमा आणि अशोक यांचे नाते. वरवर पाहता ही दोन तरुण मनांच्या प्रेमाची आणि त्यांच्या प्रदीर्घ विरहाची कथा वाटते; परंतु या प्रेमकथेच्या पाठीशी भारतीय समाजमनात खोलवर रुजलेल्या जातिव्यवस्थेचे भयावह वास्तव उभे आहे. रेशमा ही कुणबी-पाटील समाजातील, बुद्धिमान, स्वाभिमानी, शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात प्रगत अशी तरुणी आहे, तर अशोक हा सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातून आलेला, अभाव आणि संघर्ष अनुभवलेला; पण बुद्ध, फुले आणि आंबेडकरांच्या विचारांनी संस्कारित झालेला संवेदनशील, प्रज्ञावान आणि दूरदृष्टी असलेला तरुण आहे. शालेय जीवनातील त्यांची निष्पाप मैत्री हळूहळू एका निर्मळ, उत्कट आणि उदात्त प्रेमात परिवर्तित होते. मात्र भारतीय समाजातील जात ही केवळ सामाजिक ओळख राहत नाही, तर मानवी नात्यांच्या मार्गात उभी राहणारी एक अदृश्य पण अत्यंत कठोर भिंत बनते.अशोकच्या मनातील संघर्ष हा या कादंबरीतील महत्त्वाचा मानसिक आणि सामाजिक संघर्ष आहे. प्रेमासाठी बंड करणे ही केवळ दोन व्यक्तींची बाब नसते; त्यामागे कुटुंब, जात, समाज, प्रतिष्ठा आणि हिंसेची भीती यांचे गुंतागुंतीचे वास्तव असते, हे लेखकाने अशोकच्या व्यक्तिरेखेतून प्रभावीपणे दाखवले आहे. समाजातील जातीय वैमनस्य आणि त्यातून घडणाऱ्या हिंसक घटनांच्या पार्श्वभूमीवर आपल्या प्रेमाचा परिणाम केवळ स्वतःवर होणार नाही, तर आपल्या कुटुंबावर आणि समाजातील इतर निरपराध व्यक्तींवरही होऊ शकतो, याची जाणीव अशोकला आहे. त्यामुळे प्रेम असूनही तो स्वतःच्या भावनांवर संयम ठेवतो आणि स्वकर्तृत्वाच्या बळावर जीवन उभारण्यासाठी मुंबईकडे प्रयाण करतो. हा त्याग केवळ प्रेमभंगाचा प्रसंग नाही; तर भारतीय समाजातील जातिव्यवस्थेने व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर घातलेल्या मर्यादांचा तो एक वेदनादायी दस्तऐवज आहे.रेशमाच्या जीवनातील शोकांतिका अधिक तीव्र आणि हृदयद्रावक आहे. तिच्या वडिलांच्या निधनानंतर तिची आई राधाबाई सामाजिक दबाव, एकाकीपणा आणि कौटुंबिक परिस्थितीच्या ओझ्याखाली दबली जाते. अशा मानसिक दुर्बलतेच्या अवस्थेत ती संपत महाराजासारख्या ढोंगी आणि स्वार्थी व्यक्तीच्या प्रभावाखाली येते. येथे लेखक अंधश्रद्धेच्या प्रश्नाकडे केवळ धार्मिक रूढी म्हणून पाहत नाहीत, तर मानवी विवेक हरपला की व्यक्तीच्या जीवनाचे निर्णय कोणत्या प्रकारे परकीय प्रभावाखाली जातात, हे दाखवतात. धार्मिकतेचा मुखवटा धारण केलेल्या स्वार्थी शक्तींचे समाजातील अस्तित्व आणि असहाय व्यक्तींच्या भावविश्वावर त्यांचा पडणारा प्रभाव हा कादंबरीतील एक महत्त्वपूर्ण सामाजिक संदर्भ आहे.सामाजिक प्रतिष्ठा, जातीय अहंकार आणि परंपरेच्या नावाखाली रेशमाच्या इच्छेला, शिक्षणाला आणि भावनांना दुय्यम स्थान दिले जाते. तिचा विवाह दौलत या व्यसनी, उच्छृंखल आणि क्रूर स्वभावाच्या तरुणाशी लावून देण्यात येतो. विवाहसंस्था ही समाजाने पवित्रतेच्या आवरणात बंदिस्त केलेली व्यवस्था असली, तरी तिच्यामध्ये स्त्रीची इच्छा, संमती आणि व्यक्तिमत्त्व यांना कितीदा स्थान दिले जाते, हा मूलभूत प्रश्न 'विवंचना' उपस्थित करते. विवाहानंतर रेशमाच्या आयुष्यात जे घडते, ते विवाहाच्या पवित्रतेच्या कल्पनेला हादरा देणारे आहे. मद्यधुंद आणि हिंसक दौलत तिच्यावर पाशवी अत्याचार करतो आणि रेशमाचे वैवाहिक जीवन पहिल्याच क्षणी भय आणि अपमानाच्या अंधकारात ढकलले जाते. लेखक येथे विवाहाच्या सामाजिक मान्यतेपेक्षा स्त्रीच्या स्वाभिमानाला आणि तिच्या मानवी अस्तित्वाला अधिक महत्त्व देतात.रेशमाचे वैशिष्ट्य तिच्या दुःखात नसून त्या दुःखाविरुद्ध उभे राहण्याच्या धैर्यात आहे. ती नियतीपुढे शरण जात नाही. अमानुषतेच्या कैदेत जीवन कंठण्याऐवजी स्वतःचे अस्तित्व आणि स्वाभिमान वाचविण्यासाठी ती घरातून बाहेर पडते. तिचा हा निर्णय भारतीय स्त्रीच्या संघर्षाचे प्रतीकात्मक रूप धारण करतो. घराच्या चौकटीबाहेर पडणे म्हणजे केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे नसते; विशेषतः स्त्रीसाठी ते सामाजिक संरक्षण, कौटुंबिक ओळख आणि तथाकथित प्रतिष्ठेच्या कवचातून बाहेर पडण्याचे धाडस असते. रेशमाचा पुढील प्रवास हा म्हणूनच पलायनाचा नव्हे, तर आत्मशोधाचा आणि अस्तित्वरक्षणाचा प्रवास ठरतो.रेल्वे स्टेशन, पदपथ, अनोळखी शहरे आणि उपेक्षितांच्या वस्त्या या रेशमाच्या जीवनातील तात्पुरती आश्रयस्थाने बनतात. या प्रवासात तिला समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर फेकल्या गेलेल्या जगाचे दर्शन घडते. भूक, दारिद्र्य, असुरक्षितता आणि शोषण यांच्या गर्तेत जगणाऱ्या लोकांमध्येही तिला माणुसकीचे दर्शन घडते. एका बाजूला तथाकथित प्रतिष्ठित समाजातील दांभिकता आणि क्रौर्य आहे, तर दुसऱ्या बाजूला स्वतःकडे काहीही नसतानाही दुसऱ्याच्या भुकेची जाणीव ठेवणाऱ्या सामान्य माणसाची करुणा आहे. कादंबरीचा हा विरोधाभास अत्यंत अर्थपूर्ण आहे. लेखक जणू विचारतात की माणुसकीचे खरे निवासस्थान सामाजिक प्रतिष्ठेच्या महालात आहे की उपेक्षितांच्या झोपड्यांत?रेशमाच्या प्रवासात स्त्रीशोषणाची अनेक रूपे उलगडत जातात. असहाय, निराधार आणि संकटग्रस्त स्त्रियांना देहव्यापाराच्या जाळ्यात ओढणाऱ्या शक्तींचे भयावह वास्तव कादंबरीत प्रकर्षाने जाणवते. सलमासारख्या पात्रांच्या माध्यमातून स्त्रीच्या असुरक्षिततेचा सामाजिक संदर्भ अधिक व्यापक होतो. आर्थिक विवंचना, कौटुंबिक तुटण, सामाजिक आधाराचा अभाव आणि पुरुषी वासनाधारित व्यवस्था यांचे संगनमत स्त्रीला किती सहजपणे शोषणाच्या गर्तेत ढकलू शकते, याचे चित्रण अस्वस्थ करणारे आहे. या अनुभवांमुळे रेशमाची व्यक्तिरेखा अधिक व्यापक होते. ती केवळ स्वतःच्या दुःखात गुरफटलेली स्त्री राहत नाही; तर समाजाच्या तळागाळातील स्त्रियांच्या असंख्य वेदनांची प्रतिनिधी बनते.रेशमाच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत महत्त्वाचा गुण म्हणजे संकटांच्या काळातही तिची मानसिक ताकद आणि मूल्यनिष्ठा. उपासमार, आजारपण, भीती, असुरक्षितता आणि अपमान यांच्या छायेतही ती स्वतःची मानवी प्रतिष्ठा टिकविण्याचा प्रयत्न करते. तिच्या मनात अशोकची आठवण ही केवळ प्रेमिकाची आठवण नाही; तर ती विश्वास, सन्मान आणि एका वेगळ्या जीवनदृष्टीची स्मृती आहे. अशोकच्या सहवासातून तिच्या मनात रुजलेले बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे संस्कार तिच्या मानसिक जगण्याला आधार देतात. करुणा, विवेक, समता आणि आत्मसन्मान ही मूल्ये तिच्या संघर्षातील अंत:प्रेरणा बनतात.अशोकचा जीवनप्रवासही तितकाच संघर्षपूर्ण आहे. मुंबईसारख्या महानगरात अभावाशी झुंज देत, कष्ट आणि शिक्षण यांच्या साहाय्याने स्वतःचे जीवन उभारणारा अशोक हा स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवणाऱ्या नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करतो. त्याचा प्रवास सामाजिक परिस्थितीवर मात करण्याचा आहे. प्रेमभंगाची वेदना मनात असूनही तो जीवनापासून पलायन करत नाही; उलट शिक्षण, परिश्रम आणि आत्मविश्वास यांच्या माध्यमातून स्वतःची ओळख निर्माण करतो. त्याची व्यक्तिरेखा कादंबरीतील वैचारिक आशावादाचे प्रतिनिधित्व करते.रेशमा आणि अशोक यांचे पुनर्मिलन हा कादंबरीतील भावनिक आणि वैचारिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे. येथे लेखक प्रेमाच्या संकल्पनेला पारंपरिक शुद्ध-अशुद्धतेच्या चौकटीतून बाहेर काढतात. रेशमाच्या भूतकाळाकडे संशयाने किंवा दोषाच्या दृष्टीने न पाहता अशोक तिच्या वेदनेला समजून घेतो. तिच्यावर झालेल्या अत्याचारासाठी तिलाच दोषी मानणाऱ्या समाजमानसाला त्याची भूमिका एक ठाम उत्तर ठरते. स्त्रीचे शील ही तिच्या शरीरावर पुरुषप्रधान समाजाने लादलेली संकल्पना नसून तिचे मनुष्यत्व, तिची इच्छा, तिचा आत्मसन्मान आणि तिची नैतिक स्वायत्तता यांमध्ये तिच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे मूल्य दडलेले आहे, अशी व्यापक मानवी जाणीव या नात्यातून व्यक्त होते. त्यांचे मिलन म्हणूनच केवळ दोन व्यक्तींच्या प्रेमाचा सुखांत नाही. ते जातीय पूर्वग्रह, पुरुषसत्ताक नैतिकता आणि रूढीवादी विवाहकल्पनांविरुद्ध उभे राहिलेल्या विवेकाचे प्रतीक आहे. बुद्धाच्या करुणेचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेच्या विचारांचा संस्कार त्यांच्या नव्या जीवनाला वैचारिक अधिष्ठान प्रदान करतो. त्यामुळे त्यांचा संसार हा व्यक्तिगत समाधानापुरता मर्यादित राहत नाही; तर एका नव्या सामाजिक शक्यतेचे रूपक बनतो.'विवंचना' या कादंबरीला लाभलेली प्रा. माधव सरकुंडे यांची प्रस्तावना आणि मलपृष्ठावरील ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे यांचा परिचयपर मजकूर या कलाकृतीचे वैचारिक व सामाजिक अधिष्ठान अत्यंत प्रभावीपणे स्पष्ट करतो. प्रा. माधव सरकुंडे यांनी आपल्या प्रस्तावनेत ही कादंबरी केवळ एक कथा नसून भारतीय समाजव्यवस्थेतील जात, धर्म, दैववाद आणि बाबाबुवांच्या अघोरी प्रभावाची केलेली समाजशास्त्रीय चिकित्सा असल्याचे नमूद केले आहे; तसेच प्राचीन काळापासून चालत आलेल्या सदोष विवाहसंस्थेवर आणि सद्यस्थितीतील 'ऑनर किलिंग'सारख्या ज्वलंत प्रश्नांवर लेखकाने केलेले परखड भाष्य अधोरेखित केले आहे. दुसरीकडे, मलपृष्ठावर योगीराज वाघमारे यांनी उच्चवर्णीय रेशमा व मागासवर्गीय अशोक यांच्या प्रेमकथेच्या माध्यमातून जातीव्यवस्थेचे क्रूर व हिंसक वास्तव मांडले असून, आंतरजातीय विवाह करू पाहणाऱ्या तरुणाईला भोगाव्या लागणाऱ्या भयानक परिणामांची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक पेचांची दाहकता नेमकेपणाने टिपली आहे. थोडक्यात, प्रस्तावना आणि मलपृष्ठ हे दोन्ही भाग कादंबरीतील समतावादी विचार, दांभिकतेवर केलेले प्रहार आणि बुद्ध-फुले-आंबेडकरी विचारसरणीतून साकारणारे 'प्रबुद्ध भारता'चे स्वप्न वाचकांसमोर स्पष्ट करून कलाकृतीचे वाङ्मयीन व परिवर्तनात्मक महत्त्व उंचावतात.'विवंचना'चे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण आणि नागरी जीवनाचे केलेले वास्तवदर्शी चित्रण. ग्रामीण समाजातील जातीय उतरंड, प्रतिष्ठेचा खोटा बडेजाव, कुटुंबव्यवस्थेतील अंतर्गत ताणतणाव, अंधश्रद्धा आणि परंपरेचे दडपण यांचे चित्रण लेखक प्रभावीपणे करतात. त्याचवेळी महानगरातील धावपळ, उपेक्षितांचे असुरक्षित जीवन, आर्थिक संघर्ष आणि शोषणाची विविध रूपेही कथानकात येतात. या दोन सामाजिक विश्वांतील भिन्नता असूनही त्यांना जोडणारा समान धागा म्हणजे माणसाच्या जगण्याची धडपड आणि मानवी प्रतिष्ठेचा शोध.लेखकाची भाषाशैली प्रवाही, ओघवती आणि प्रसंगानुरूप परिणामकारक आहे. कथानकातील भावनिक ताण, सामाजिक संघर्ष आणि पात्रांच्या अंतर्मनातील घालमेल यांचे चित्रण करताना भाषा अनेक ठिकाणी संवेदनशील आणि हृदयस्पर्शी बनते. विशेषतः रेशमाच्या मानसिक अवस्थेचे, तिच्या भयाचे, असुरक्षिततेचे आणि अस्तित्वासाठीच्या संघर्षाचे वर्णन वाचकाला तिच्या वेदनेशी जोडते. कादंबरीतील काही प्रसंग अस्वस्थ करतात; परंतु हे अस्वस्थपणच या साहित्यकृतीचे सामर्थ्य आहे कारण सामाजिक वास्तवाकडे पाठ फिरवून साहित्य जीवनाचा खरा अर्थ पकडू शकत नाही.'विवंचना' ही धार्मिक दांभिकता, अंधश्रद्धा, बुवाबाजी, जातीय विषमता आणि पुरुषप्रधान मानसिकता यांच्यावर थेट प्रहार करणारी कादंबरी आहे. तथापि तिचे महत्त्व केवळ विद्रोहात नाही; तर त्या विद्रोहाच्या पाठीशी असलेल्या मानवी मूल्यांमध्ये आहे. लेखक अन्यायाचा निषेध करतात, पण त्याचबरोबर करुणा, प्रेम, विवेक, शिक्षण आणि आत्मसन्मान यांच्या आधारे एका अधिक मानवी समाजाची शक्यता सुचवितात. म्हणूनच ही कादंबरी नकारात्मकतेत अडकून राहत नाही; ती संघर्षातून परिवर्तनाची दिशा शोधते.एकंदरीत, डॉ. कोंडबा भगवान हाटकर यांची 'विवंचना' ही जात, लिंग, विवाह, धर्म आणि सामाजिक प्रतिष्ठा यांच्या गुंतागुंतीच्या प्रश्नांना मानवी जीवनाच्या केंद्रस्थानी ठेवून विचार करणारी प्रभावी कादंबरी आहे. रेशमाच्या संघर्षात भारतीय स्त्रीच्या अस्तित्वाची वेदना आहे, अशोकच्या प्रवासात वंचित समाजाच्या स्वाभिमानाची आकांक्षा आहे आणि त्यांच्या मिलनात समतेवर आधारित नव्या समाजाची आशा आहे. ही कादंबरी वाचकाला केवळ कथानकाच्या प्रवाहात घेऊन जात नाही, तर त्याला स्वतःच्या समाजाकडे, मूल्यांकडे आणि मानवी संबंधांकडे नव्या दृष्टीने पाहण्यास प्रवृत्त करते. सामाजिक वास्तवाची जाणीव, वैचारिक अधिष्ठान, स्त्री-अस्तित्वाची संवेदनशील मांडणी आणि परिवर्तनाची प्रबळ आकांक्षा यांमुळे 'विवंचना' ही समकालीन मराठी कादंबरीविश्वातील एक महत्त्वपूर्ण, विचारप्रवर्तक आणि लक्षवेधी साहित्यकृती म्हणून निश्चितच अधोरेखित होते. (समीक्षक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्त वरिष्ठ अधिकारी आणि फुले-शाहू-आंबेडकर व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)ग्रंथ: विवंचना',

**लेखक: डॉ. कोंडबा भगवान हाटकर, प्रकाशक: कैलास पब्लिकेशन्स, पृष्ठे: १६०, किंमत: रु. ३००**

## घड्याळ दादा

घड्याळ दादा घड्याळ दादा,
टिकटिक टिकटिक करतो.
वेळ दाखविण्यासाठी सदा,
गोलगोल गोलगोल फिरतो. १

घड्याळयातल्या काट्यांची,
चाले पाठशिवनीचा खेळ,
फिरता फिरता गोल गोल,
लोकांना दाखवितो तू वेळ. २

सतत सातत्याने चालावे,
कर्म करून तू दाखवितो.
वेळेवरती नाही आल्यास,
त्याला माघारी तू पाठवितो. ३

फिरून फिरून सातत्याने,
अविरत करतोय तू काम.
वेळेवरती काम केल्यास,
कामासोबत मिळतो दाम. ४

घड्याळ दादा घड्याळ दादा,
दमत नाही फिरून फिरून.
वेळेवरती गजर वाजवून,
सर्वांना उठवितो जाग करून. ५

वेळेवरती उठवून सर्वांना,
दादा वेळेचे महत्व दावतो.
वेळेवरती काम करण्याचे,
प्रत्येकाला सवय तू लावतो. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103